प्रकरण चौथे :

# अनंत कदम हयांच्या कादंबऱ्यामधील व्यक्तिरेखा


४.१. प्रास्ताविक पृ.४५

४.२. अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) पृ.४५ ते पृ.४९

हया कादंबरीमधील व्यक्तिरेखा

४.३. अनंत कदम हयांच्या 'कॅन्सर' (१९८२) पृ.४९ ते पृ.५६

हया कादंबरीमधील व्यक्तिरेखा

४.४. समारोप पृ.५६

प्रकरण चौथे :

# अनंत कदम हयांच्या कादंबऱ्यामधील व्यक्तिरेखा

## ४.१. प्रास्ताविक :

मानवी मनातील अविनाशी अशा धर्माचे चित्र साहित्यामध्ये उमटलेले असते. राग, द्वेष, प्रणय, वात्सल्य, लोभ, मत्सर इ. विकास कोणत्याही मानवाच्या ठिकाणी असणारच, अशा व्यक्तिरेखा साहित्यात आढळतात. म्हणून तर मानवी मनाला साहित्याचे सदैव आकर्षण राहिले आहे. जे साहित्य सर्वसामान्य शाश्वत मनोधर्माच्या आणि सुखदु:खाच्या अधिष्ठानावर उभे असते, तेच उत्तम आनंद देऊ शकते.

प्रस्तुत चौथ्या प्रकरणामध्ये कादंबरीकार अनंत कदम हयांच्या 'किडे'(१९७१) व 'कॅन्सर'(१९८२) हया दोन कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखा जाणून घ्यावयाच्या आहेत.

'किडे' ही कादंबरी १९७१ साली प्रकाशित झाली व 'कॅन्सर' ही कादंबरी १९८२ साली प्रकाशित झाली. कोणत्याही कादंबरीकाराला कादंबरीलेखनातून आपल्या भावना, विचार, अनुभव इ. गोष्टी वाचकापर्यंत पोहोचवायचे असतात. हे प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी कादंबरीत व्यक्तिरेखांचे गरज असते. कादंबरीच्या कल्पना, विचार, भावना हया व्यक्तिरेखांमधुन उतरत असतात.

## ४.२. 'किडे' (१९७१) हया कादंबरीमधील व्यक्तिरेखा :

हया कादंबरीमध्ये छोटया छोटया वाक्यांमधून मनाचे सूक्ष्म हवळे पोत मांडण्याऱ्या आत्मक्लेषी प्रथमपुरुषी निवेदन तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

नोकरी गेल्यानंतर घरात सर्वांना नकोशा झालेल्या एका तरुणने आपला एक दिवसाचा दिनक्रम सांगितला आहे. हयामध्ये 'तो' हा हया कादंबरीचा नायक आहे. प्रथम पुरुषी निवेदन असल्याने 'तो' ला कोणत्याही स्वरुपाचे नाव दिलेल नाही. हया कादंबरीमधील अनुभवविश्व विशेष नावीन्यपूर्ण व वैविध्यपूर्ण आहे.

कादंबरीमधील प्रमुख व्यक्तिरेखा असणारा 'तो' हा एक सरळमार्गी असतो. पण लाच घेताना मुद्दाम पकडून देऊन त्याच्या जीवनाची वेगळीच वाटचाल सुरु होते. पूर्वी उत्साही असणारा, मंदिरात जाणारा, समुद्रावर फेरफटका मारणारा 'तो' हया घटनेनंतर पुरताच बदलतो. घरात मिळणारी चांगली वागणूक बंद होते. पुस्तकातील चांगले विचार फक्त वाचायचे असतात, हा जगाचा व्यवहार त्याला समजला नाही.

कस्टम ऑफिसरने पकडल्यानंतर जी शिक्षा होते, ती का होते, हयाबद्दल त्याचे मन विव्हळत असते. शिक्षा झाल्यानंतर त्याला अनुभवास येणारे जग, वास्तव परिस्थिती आणि मनातील निराशा हयातून जगाचे दर्शन 'तो' हया व्यक्तिरेखातून घडवून आणले आहे. 'तो' ही प्रमुख व्यक्तिरेखा असून त्याच्या माध्यमातून कादंबरीकार समाजातील वास्तव परिस्थितीचे प्रभावी चित्रण करण्यात यशस्वी झाला आहे.

कादंबरीत व्यक्तिचित्रणाचा आवाका मोठा असतो. तिच्यातून व्यक्तीचा समग्र विकास चित्रित होतो. तसेच कादंबरीतून एकापेक्षा जास्त व्यक्तिरेखा चित्रित करता येतात. प्रमुख व्यक्तिरेखा व गौण व्यक्तिरेखा असा तिचा आवाका असतो. 'किडे' हया कादंबरीमध्ये 'तो' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे.

कदमांच्या कादंबरीमधील व्यक्तिरेखा सृष्टीतील इतर गोष्टींचा वर्णनापेक्षा मानवी अंत:करणातील ज्या घडामोडी, ज्या घटना, जी वादळे निर्माण होतात, जे भावबंध

निर्माण होतात, त्याचे जिवंत दर्शन घडवितात. किडे कादंबरीमधील 'तो' ही व्यक्तीरेखा सुशिक्षित, सरळमार्गी, प्रामाणिक, कर्तव्यदक्ष अशी आहे. पण समाजात / नोकरीच्या ठिकाणी अशा व्यक्तींना येणारा अनुभव आपल्याला अस्वस्थ करणारा असतो. संपूर्ण जग हे स्वार्थी आहे, ढोंगी आहे आणि पैसा हा सर्वात महत्वाचा आहे. पैसा असेल, तर आपल्याला किंमत असते, हया सर्व बाबींचा अनुभव 'तो' हया व्यक्तिरेखामधून कादंबरीकाराने मांडला आहे.

'तो' हया व्यक्तिरेखेमधून भोवतालचे अमर्याद, सतत जवळ येणारे सलगीचे जग आणि आयुष्यातील सर्व लौकिकाला पाठ फिरवावी लागल्यामुळे अधिक तीव्रतेने येणारी निराशा, चीड, राग हयातून सुटका नाही, ही अनुभवाची पातळी 'तो' मधून प्रगट करण्यात कादंबरीकार यशस्वी झाला आहे.

प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर असताना घरातील व्यक्तींकडून, शेजाऱ्यांकडून, समाजाकडून मिळणारी वागणूक आणि नोकरी गमावल्यानंतर मिळणारी वागणूक हयामधील असणारा फरक हयामुळे सर्वांच्याबद्दल त्याच्या मनात तिरस्काराची भावना निर्माण होते. चांगले विचार फक्त वाचावयाचे असतात, हा जगाचा विचार त्याला कळत नाही. नायकाच्या संपर्कामध्ये जेवढे लोक येतात, तेवढे सर्व स्वार्थी निघतात. आईसुध्दा आपल्या दोन मुलांमध्ये फरक करते. जेवणासाठी 'तो' ला शिळे अन्न वाढते. कारण 'तो' पैसे मिळवून न आणता फक्त बसून खात असतो. त्यामुळे त्याला आई, भाऊ, प्रियसी, शेजारी, ऑफिसमधील सहकारी, रस्त्यावरील प्रत्येक व्यक्ती हया सर्वांची वागणूक स्वार्थी वाटते. हया सर्वांच्या चेहऱ्यात खोल शिरुन शोध घेण्याचा 'तो' प्रयत्न करतो. त्याला सापडते, प्रत्येक माणूस किडा आहे, स्वार्थाचा किडा! दुसऱ्याला पोखरुन स्वत:स

पोसणारा! स्वत:भोवती घिरटणारा माणसांचा स्वार्थीपणा, आपमतलबी हेतू, सगळीकडे वर्चस्व गाजविण्याची भावना हयामुळे जीवन एक गटार आहे. माणसं झुरळं, उंदीर आहेत. ती आयुष्यभर घाणीत बरबटत असतात, काहीतरी कुरतडत असतात, अशी तिरस्काराची भावना कादंबरीच्या नायकाची झालेली आहे. कादंबरीचा नायक हा हलबल झालेला आहे. मनातील रुखरुखीला सामावून घेणारी व्यवस्था समोर नाही, ही अगतिक जाणीव त्यांचे सर्वांग पेटवते.

'किडे' हया कादंबरीमधील 'तो' हया प्रमुख व्यक्तिरेखेचा विचार करता कदमांनी त्याच्या अंतर्मनात खोलवर बुडी घेऊन त्याच्या मनातील भावतरंग, विचार वाचकांना उलगडून दाखविले आहेत. ही व्यक्तिरेखा समाजातील भ्रष्टाचार, गैरव्यवहार, वशिलेबाजी स्वार्थीपणा, भोगवादीवृत्ती, राजकारण इ. कोणत्याही प्रश्नावर, समस्येवर उपाय सुचवत नाही किंवा बंड करुन उठत नाही, तर जसे आहे तसे फक्त पाहत राहते. फक्त मनामधील वेगवेगळे विचार /प्रतिक्रया तिच्या पुरतेच मर्यादित राहतात. जे काही दिवसते आहे, ते पहावयाचे काम ही व्यक्तिरेखा करताना दिसते. एका नोकरीमधून कमी केल्यानंतर दुसऱ्या नोकरी आत्मविश्वासपूर्वक शोधताना ही व्यक्तिरेखा दिसत नाही. नोकरी गमावल्यानंतर प्रत्येक व्यक्ती ही 'तो' ला स्वार्थी वाटू लागते .

मानवी जीवन दुर्बलतेने व्यापले आहे . ते असहाय्य आहे, हयाची जाणीव 'तो' हया व्यक्तिरेखेतून होत राहते. उत्तरार्धामध्ये हया सर्व दुष्ट चक्रामधून सुटण्यासाठी 'तो' प्रयत्न करतो. पण हया दुष्टचक्रातून आपण सुटत नाही की काय, असे 'तो' ला वाटते. हया अपरिहार्य सत्याला निश्चयाने पाठ फिरवण्याचे सामर्थ्य शेवटी त्याच्याकडे येते आणि सर्वांना सोडून 'तो' निघून जातो. अशी सरळमार्गी, प्रमाणिक तरुणाची 'तो'

ही व्यक्तिरेखा समाजातील भ्रष्टाचारी व्यवस्थेमुळे किती निराश, हतबल होते, आत्मविश्वास गमावून बसते, हयाचे चित्रण प्रभावीपणे कदमांनी केले आहे.

हया 'किडे' कादंबरीमध्ये 'तो' हया प्रमुख व्यक्तिरेखेशिवाय काही गौण व्यक्तिरेखा ही आहेत. आई ही परिस्थितीनुसार वागण्यात दुटप्पीपणा असणारी, नोकरी असताना, पैसा कमविताना असणारी वागणूक आणि नोकरी गमविल्यानंतर आईकडून मिळणारी वागणूक ही स्वार्थीपणाची वाटते. भाऊसुध्दा स्वार्थी. आजपर्यंत चैन-मजा हयांचा त्याग करुन 'तो' ने कुटुंबाला हातभार लावला. पण सर्वजण हे सोयीस्करपणे विसरुन गेले. पैसा संपला की सारे संपले, असे म्हणणाऱ्या हया गौण व्यक्तिरेखा आहेत. पैसा हाती आल्यानंतर वागणे, बोलणे बदलणाऱ्या, संस्कृती बदलणाऱ्या शीला परांजपे सारख्या मैत्रिणीही आहेत.

अशा प्रकारे कादंबरीकारांने 'किडे'(१९७१) हया कादंबरीमध्ये नागरी जीवनातील व्यक्तिरेखा चित्रित केल्या आहेत. सर्व व्यक्तिरेखा शहरी मध्यम वर्गीय व चाळीमध्ये राहणाऱ्या आहेत. शहरामधील अडचणी, नोकरीची समस्या, दारिद्रय, राहण्याचा प्रश्न, बेकारी, भ्रष्टाचार, व्यभिचार इ. सर्व समस्यांची यशस्वीपणे मांडणी करणाऱ्या हया व्यक्तिरेखा आहेत.

### ४.३. 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमधील व्यक्तिरेखा :

'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमध्ये दोन प्रमुख व्यक्तिरेखा आहेत, तर पाच गौण व्यक्तिरेखा आहेत. मात्र कादंबरीमधील कथानक पुढे सरकण्यासाठी तशी प्रत्येक व्यक्तिरेखा ही महत्त्वाचीच आहे. आता एकेका व्यक्तिरेखेचा परिचय करुन घेऊ.

ह्रदयनाथ पांडुरंग भोसले ही हया कादंबरीमधील प्रमुख व्यक्तिरेखा असून ती बेकारीने हैराण झालेली, पण सरळमार्गी अशी आहे. हाच हया कादंबरीचा नायक आहे. नागरी जीवनातील चित्रण करणारी ही कादंबरी आहे. कादंबरीचा नायक सर्व संकटांना आत्मविश्वासपूर्वक तोंड देत आहे. कोणत्याही परिस्थितीत हताश व्हावयाचे नाही, असा ध्येयवादी हा नायक आहे. प्राप्त परिस्थितीपायी तो हैराण झाला आहे. वडील साधे कंपाऊंडर. घरात हलाखीची परिस्थिती, तशात नोकरी नाही आणि कुटूंबामध्ये तो मोठा असल्याने बरीचशी जबाबदारी त्याच्यावरच असते.

गुलामगिरी, वशिलेबाजी हयांनी वैतागलेला हा नायक स्वतंत्र धंदा करण्याचे मनसुबे रचतो. पण ते हवेतच राहतात. प्राप्त परिस्थितीला सामना देत असताना तो व्यवहारापेक्षा तत्त्वाला महत्व देतो. ध्येयवादाच्या तात्त्विक बैठकीवरुन तो सर्व जीवनाकडे सखोलपणे पाहतो. त्यामुळे जगण्यातील निरर्थकता, उदासीनता त्याला बोचत राहते. कादंबरीकाराने ह्रदयनाथाचे व्यक्तिचित्र संथगतीने, पण कलात्मकरीतीने उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

नोकरी करावी, न करावी, असा विचार चालू असतानाच मानकामे हया मित्राच्या सहाय्याने ह्रदयनाथला एका कॉलेजमध्ये 'इंग्रजी' विषयाचा प्राध्यापक म्हणून नोकरी मिळते. पण कॉलेजमधील राजकारण त्याला खुपू लागते. त्याकडे तो दुर्लक्ष करतो. सर्वत्र स्थिरस्थावर होत असतानाच वर्गातील एका शबाना नावाच्या इराणी मुसलमान मुलीच्या प्रेमात तो पडतो व तेथून त्याच्या जीवनाची फरपट सुरु होते.

जातीनिष्ठ वर्णव्यवस्थेची कोंडी फोडण्याची महत्त्वाची भूमिका हया व्यक्तिरेखेने पार पाडली आहे. घरच्या व समाजाच्या विरोधाला न जुमानता तो शबानाशीच विवाहबध्द होतो. आंतरधर्मीय विवाहामुळे निर्माण होणारे प्रश्न, त्यातून

हृदयनाथाने सुटण्यासाठी केलेले जीवनाचे रान हयाचे चित्रण हृदयनाथाच्या व्यक्तिरेखेमधून परिस्थितीचे भान राखून केले आहे. हृदयनाथ हा कोणतेही जातीधर्म, भेदभाव, उच्चनीच काहीही न मानणारा आहे. सर्वधर्म समभाव मानणारा असून जगामध्ये माणुसकी हा एकच धर्म तो मानत असे. परंतु हयामुळेच त्याच्या जीवनाची भटकंती सुरु झालेली दिसून येते. हृदयनाथ हा स्वाभिमानी वृत्तीचा असल्याने व नोकरीसाठी वरिष्ठांची मर्जी राखणे त्याचा स्वभावात नसल्यामुळे व आंतरधर्मीय विवाहामुळे प्राध्यापकी व्यवसायाला त्याला मुकावे लागते. विद्यापीठीय नोकरी करीत असताना हृदयनाथ विद्यापीठीय कारभार, तेथील अंदाधुंदी जवळून पाहून, समाजाची अधोगती पाहून विपण्ण होतो.

'कॅन्सर' हया कादंबरीमधील हृदयनाथ हा दैंनदिन जीवनव्यवहाराला कंटाळून त्याविषयी चीड व्यक्त करणार आहे. प्रामाणिकपणे जीवन जगण्यासाठी मरेपर्यंत झगडणे त्याला पटते, पण तेही स्वत:च्या हिमतीवर, अशी एक ध्येयेनिष्ठ व्यक्तिरेखा आहे. त्याचबरोबर आंतरधर्मीय विवाहाचे शिवधनुष्य सामर्थ्यानिशी पेलून धरणारा एक क्रांतिकारी समाजसुधारक, पारंपारिकते विरुद्ध बंडखोरी करणारा एक कृतिशील बंडखोर नायक, तसेच विद्यापीठीय कारभारातील अन्यायकारक समस्यांचे जोखड आपल्यासमोर मांडणारा एक विचारवंत अशी हृदयनाथाची व्यक्तिरेखा आहे. हृदयनाथ जेवढा धीरोदात्त, तेवढाच भाबडेपणाने जगणारा आणि बुध्दिवादाने जगत असूनही अंधश्रध्देच्या आधीन जाणारा, असा आहे.

अशा वेगवेगळ्या भूमिकेमध्ये आपल्यासमोर उभ्या असलेला हया कादंबरीमधील नायकाची व्यक्तिरेखा ही अनेक विघातक समस्यांवर प्रकाश टाकताना दिसते.

काळा बाजार, लाचारी, वशिलेबाजी हया सर्व प्रवृत्तींचा त्याला कंटाळा येतो. ह्दयनाथ ही व्यक्तिरेखा अनेक समस्यांवर प्रकाश टाकते. परंतू हया सर्वांवर क्रियाशील उपाययोजना बनविण्याची धमक मात्र त्या ठिकाणी नाही. त्याची बंडखोरी, त्याचे निदान थोडेशे उपरेच वाटते.

अशी ही प्रमुख व्यक्तिरेखा व तिच्यावर आलेल्या समस्या व अडचणी हयांच्या माध्यमातून समाजमनाला लागलेल्या विविधस्तरीय कॅन्सरची बहुविध रुपे वाचकांसमोर ठेवण्याचा कादंबरीकाराने प्रयत्न केला आहे.

हयाशिवाय हया प्रमुख व्यक्तिरेखेला शेवटपर्यंत साथ देणारी ह्रदयनाथाची पत्नी सुमन ऊर्फ शबाना ही दुसरी प्रमुख व्यक्तिरेखा आहे. भारतीय संस्कृतीला साजेशी अशी पतीला संकटांमध्ये, अडचणींमध्ये मदत करणारी, त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणारी अशी शबाना ही व्यक्तिरेखा आहे. जरी शबाना इराणी मुसलमान असली, तरीही आंतरधर्मीय लग्न झाल्यानंतर ती सुमन हे नाव स्वीकारते. आपल्या बोलण्यात-वागण्यात ती हिंदूधर्माप्रमाणे बदल करते. रोज न चुकता टिकली लावते. आंतरधर्मीय प्रेमविवाह केल्यानंतर स्त्रीला समाजाकडून किती छळ, किती अपमान सहन करावा लागतो, ते हया व्यक्तिरेखेतून मांडण्यात आले आहे.

रुढी परंपरेच्या विरोधात जाऊन शबाना ही आपल्या मनाला भावणाऱ्या ह्रदयनाथाशी घरच्यांचा विरोध असतानाही लग्न करते. शबानाच्या घरी तिचे आई-वडील व लहान भाऊ असे राहत असतात. हया इराणी मुसलमान कुटुंबाचा हिंदूधर्माविषयी तिरस्कार असल्याने लग्नासाठी घरच्यांचा विरोध होतो. आंतरधर्मीय लग्नानंतर होणाऱ्या छळास शबाना घाबरत नाही. 'मुडदयासारखे जगण्यापेक्षा मुडदा पडलेला बरा. कुणाच्या जबरदस्तीने, कुणाच्या ठराविक कल्पनांच्या कातळामुळे माझा प्रवाह बदलणे मला

जमणार नाही,' असे प्रकट विचार मांडणारी शबाना ही व्यक्तिरेखा म्हणजे स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्न करणारी आहे.

शबानाचे सर्व कुटूंब परत इराणला जाते. पण पत्राद्वारे शिव्याशाप देणे सुरुच असते. आंतरधर्मीय विवाह केल्यामुळे ह्रदयनाथ बरोबर तिची फरफट सुरु होते. नातेवाईकांशी कोणताही संपर्क नाही. समाजाचे टोचून बोलणे, वारंवार नोकरीसाठी भटकंती, संसारातील सुखापेक्षा दु:खच अधिक असले, तरीही शबाना न डगमगता ह्दयनाथाला मदत करत असते. हिंदू धर्माने पत्नीला दिलेले अर्धांगीची भूमिका ती पूर्णपणे वटवत असलेली दिसून येते. कर्ज काढून घेतलेलं मंगळसूत्र मला मुळीच नको, असे म्हणणारी शबाना समाजाला, एकुणच स्त्रीवर्गाला कर्जाचे परिणाम सांगणारी आहे.

कादंबरीकार अनंत कदम ह्यांनी शबानाच्या व्यक्तिरेखेतून स्त्रीवर्गाची समाजातील स्थिती नोंदवली आहे. स्त्रियांनी आपल्या संसारामध्ये कशा प्रकारचे योगदान दयावे हे हया व्यक्तिरेखेतून कादंबरीकार सुचवून जातो. नवऱ्यासमोर निराशा न दाखवता त्याला कायम प्रोत्साहन देण्याचे काम शबाना करीत असते. तसेच नवऱ्याच्याबरोबर होत असणारी भटकंती, शेजाऱ्याची आरडाओरड, आजारपण, नातेवाईकांचा त्रास, नोकरीचा बेभरवसा हया सर्वांना तोंड देण्याची हिंमत शबानामध्ये असल्याचे दिसते. ह्रदयनाथाला मानसिक स्थैर्य, समाधान देण्याचे महत्त्वाची जबाबदारी शबाना पार पाडते. शबाना आणि ह्रदयनाथ हया दोघांच्याही विचारांची प्रगल्भता दिसून येते. शबानाची विचार करण्याची पद्धत म्हणजे जातिभेद, धर्मभेद विसरुन सर्वांनी माणूस म्हणून जगावे, एकमेकाला मदत करावी, कर्जकाढून सोने-चांदी खरेदी करु नये, आपल्या गरजा कमी कराव्यात अशी असते. असे विचार समाजाला व स्त्रीवर्गाला मार्गदर्शन करणारे ठरतात.

कादंबरीकार अनंत कदम ह्यांनी शबानाची व्यक्तिरेखा एका आदर्श पतिव्रता स्त्रीची रेखाटली आहे.

एकंदरीत, घराला मुकलेल्या आणि सामाजिक कॅन्सरने पछाडलेल्या नायकावर एकामागून एक संकटे येतात. निसर्गनिर्मित, ईश्वरनिर्मित व समाजनिर्मित कॅन्सरला हृदयनाथाबरोबर शबानाही शरण जात नाही. शबानाही उच्च मानसिक शक्तीच्या आधारे सर्व संकटे परतवून लावले. अशी एक सामर्थ्यशाली स्त्रीची व्यक्तिरेखा कादंबरीकाराने चित्रीत केली आहे. हृदयनाथाला कॅन्सर झाल्याचे समजल्यानंतर शबानाची मानसिक स्थिती कोलमडते, धीर खचतो. स्त्रीसुलभ हळव्या अशा तिच्या प्रतिक्रिया असणे स्वाभाविक आहे. त्यानुसार कादंबरीकाराने ह्या व्यक्तिरेखेला योग्य न्याय दिला आहे.

हिंदू संस्कृतीमध्ये पतिस अगोदर मरण येणे, हे पत्नीच्या दृष्टीने भाग्याचे मानले जाते. शबाना इराणी मुसलामन जरी असली, तरी हृदयनाथाबरोबर प्रेमविवाह केल्यानंतर तिने हिंदू संस्कृती व रुढी परंपरा जपल्या आहेत. हृदयनाथाला कॅन्सर झाल्याचे समजल्यानंतर पतीला मरण येण्याऐवजी 'मलाच मरण दे' म्हणणारी शबाना ही व्यक्तिरेखा हिंदू संस्कृतीला शोभणारी अशी आदर्श स्त्री ची रेखाटली आहे . कादंबरीमध्ये अनंत कदम ह्यांनी फार हालअपेष्टा सोसणारी, पतीला मदत करणारी, कष्ट उपसणारी अशी शबानाची व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. शबाना कोणत्याही संकटाला सामोरी जाते, पण निराशेला घाबरुन नव्हे! एका उच्च मानसिक शक्तीला वा निष्ठेच्या पायावर ती खंबीरपणे उभी राहून. हृदयनाथाचा मृत्यू स्वत:वर ओढवून घेते, हा कादंबरीकाराने केलेला शेवट अतिशियोक्तीचा वाटतो.

वरील दोन प्रमुख व्यक्तिरेखाबरोबर काही गौण व्यक्तिरेखाही महत्वाच्या आहेत. हयामध्ये हृदयनाथाची आई ही एक व्यक्तिरेखा आहे. परंपरा, रुढी हयामध्ये जखडलेली, लग्न म्हणजे इस्टेट, हुंडा घेणे, आपल्या जातीतीलच मुलीशी लग्न करणे, अशा परंपराच्या जोखडामध्ये असणारी आई ही व्यक्तिरेखा. धर्म, जात, रुढी परंपरा हयांना महत्त्व देणारी, नव्या परंपरांना न स्वीकारणारी, सनातनी अशी व्यक्तिरेखा जिच्यामुळे हृदयनाथाच संपूर्ण आयुष्यच बदलून गेले. समाजाच्या, नातेवाईकांच्या, शेजाऱ्यांची भितीमुळे हृदयनाथाच्या आंतरधर्मीय विवाहास विरोध करुन त्याला घरातून बाहेर काढणारी त्याची आई परंपरांना, रुढींना महत्त्व देणारी आहे . हृदयनाथ माणसातील माणुसकीला महत्त्व देणारा आहे, तरी आई इस्टेट, पैसा, ब्लॉक, नोकरी हयांना महत्त्व देणारी आहे. त्याचबरोबर विचारपध्दतीने आईच्या विरोधात वडिलांची व्यक्तिरेखा कादंबरीकाराने रेखाटली आहे. कंपाऊंडरची नोकरी करत कुटुंबाला सांभाळताना हृदयनाथच्या वडिलांची आर्थिक ओढाताण व्हायची. पण त्यांनी हयाची घराला कधी जाणीव होऊ दिली नाही. हृदयनाथाला अशा परिस्थितीत शिकवणारे वडील आणि त्यांच्याच विचारांच्या सावलीत वाढलेला हृदयनाथ. आधुनिक विचारसरणीची ही व्यक्तिरेखा हृदयनाथास शेवटपर्यंत मदत करते. आंतरधर्मीय विवाहास मान्यता देणारी आणि शेवटच्या घटकेपर्यंत हृदयनाथाला मदत करणारी एक आदर्श वडिलांची व्यक्तिरेखा रंगविण्याचा कादंबरीकाराने यशस्वी प्रयत्न केला आहे. हृदयनाथाच्या आंतरधर्मीय विवाहास होणारा विरोध व त्यामुळे त्याच्या बहिणीची लग्ने सहा वर्षासाठी पुढे ढकलणे, हयासाठी आपण कारणीभूत नाही, तर लोकांची विचारसरणीच कारणीभूत होती हे वडिलांनी जाणले होते.

अशी आधुनिक विचारसरणीची वडिलांची व्यक्तिरेखा आणि सनातनी विचारांची आईची व्यक्तिरेखा अशा परस्पर विरुध्द, दोन व्यक्तिरेखा एकाच कुटुंबामध्ये दाखवून कादंबरीकाराने समाजातील दोन विचारप्रवाह प्रतिनिधिक स्वरुपात यशस्वीपणे चित्रित केल्या आहेत.

हया व्यक्तिरेखांशिवाय प्रामाणिकपणे मित्राला मदत करणारा, नोकरी नाही, पैसा नाही, पण मित्राला संकटामध्ये मदत करण्याची प्रामाणिक भावना असणारा 'विंदा,' तर परिस्थितीचा गैरफायदा घेणारा, समोर स्तुती करणारा, स्वार्थी आणि लबाड 'पांडुरंग' हया अन्य व्यक्तिरेखा आहेत. एक मतलबी स्वभावाची, गरिबीचा आव आणणारी, अध्यात्माचे ढोंग करणारी 'पांडुरंग' ही व्यक्तिरेखा, तर दुसरी प्रामाणिक, मित्रत्व जपणारी 'विंदा' सारखी व्यक्तिरेखा असे रेखाटून कादंबरीकाराने समाजवास्तव प्रगट केले आहे.

## ४.४. समारोप :

हया कादंबरीमधील वरील व्यक्तिरेखा आकर्षकपणे मांडून समाजातील वस्तुस्थिती कादंबरीकाराने मांडली आहे. त्यातील काही व्यक्तिरेखा प्रमाणिक, माणुसकीला महत्व देणाऱ्या, सहकार्यवृत्तीच्या, आधुनिक विचारांच्या, तर काही व्यक्तिरेखा सनातनी विचारांच्या, लबाड, स्वार्थी, भ्रष्टाचारी, व्यसनी अशा आहेत. कादंबरीकार अनंत कदम हयांनी हया प्रत्येक व्यक्तिरेखेला योग्य न्याय दिला आहे.